विशेष दिवाणी दावा क्रमांक ४५/२०१३ मधील **नि. ११४ वरील आदेश**

**(CNR No. MHSN020003152013)**

१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दावा अंतिम युक्तिवादासाठी प्रलंबित असताना पुन्हा त्यांना पुरावा घेण्यास परवानगी मिळावी म्हणुन दाखल केलेला आहे.

२. सदरहु अर्जाला अनुषंगून प्रतिवादी क्रमांक १ ते ३ यांनी त्याच अर्जावर त्यांचे विस्तृत म्हणणे दाखल केलेले आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे सदरचा दावा अत्यंत जुना आहे, तसेच वादी यांनी निशाणी क्रमांक ११० कडे पुरसीस दाखल करुन दिनांक १५.०६.२०२२ रोजी त्यांचा पुरावा बंद केलेला होता. त्यानंतर प्रतिवादींचा पुरावा बंद करण्यात आल्यानंतर खुप कालावधी लोटल्यानंतर वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिलेला असल्यामुळे तो फेटाळण्यात यावा असे प्रतिपादन प्रतिवादी यांनी केलेले आहे.

३. प्रतिवादी क्रमांक ४ व ५ यांनी देखील वादींचा अर्ज फेटाळण्यात यावा असे कथन केलेले आहे.

४. अर्जाला अनुषंगून वादी, प्रतिवादी यांचा युक्तिवाद ऐकला. मुळ दाव्याचे अवलोकन केले. दाव्याला अनुषंगून निशाणी क्रमांक ७८ वर जे मुद्दे निश्चित केलेले आहेत त्याचे अवलोकन केले.

५. वादी यांनी दाव्यामध्ये वाटपाची, तसेच तक्रारविषय असणा–या

खरेदीखतासंदर्भात ठरावाची मागणी केलेली आहे. तसेच त्यांनी प्रतिवादीविरुध्द ताकीदीची मागणी केलेली आहे. वादींच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी जे निशाणी क्रमांक ७६ कडे कागदपत्र दाखल केलेले आहेत त्यांना अनुषंगून त्यांना साक्षीदार तपासणे आवश्यक वाटते. वादी यांनी निशाणी क्रमांक ७६ कडील कागदयादी दिनांक २१.१०.२०१५ रोजी दाखल केलेली आहे. त्यानंतर वादी यांनी दिनांक १५.०२.२०१९ रोजी म्हणजेच तब्बल साडेतीन वर्षानंतर त्यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र निशाणी क्रमांक ८४ कडे दाखल केलेले आहे. त्यानंतर वादींचा उलटतपास दिनांक १०.१२.२०२१ रोजी पुर्ण झालेला होता. तसेच वादीतर्फे साक्षीदार रफिक पटेल यांचा उलटतपास दिनांक ३१.०३.२०२२ रोजी पुर्ण झालेला होता. त्यानंतर दिनांक १६.०४.२०२२ व ०४.०५.२०२२ या तारखांना वादी यांनी कोणताही पुरावा दिलेला नाही. त्यानंतर दिनांक १५.०६.२०२२ रोजी वादी यांनी त्यांचा पुरावा बंद केल्याची पुरसीस दिली होती.

६. त्यानंतर अनेक तारखा प्रतिवादीच्या पुराव्यासाठी ठेवण्यात आले होते. सरतेशेवटी दिनांक ०३.०३.२०२३ रोजी प्रतिवादी क्रमांक ६ चा पुरावा बंद करण्यात आला. त्यानंतर दिनांक २९.०३.२०२३, १९.०४.२०२३, २६.०४.२०२३ या तारखा दाव्याच्या अंतिम युक्तिवादासाठी नेमण्यात आलेल्या होत्या. परंतु त्यावेळेस वादी यांनी युक्तिवाद केला नाही अगर प्रस्तुतचा अर्जदेखील त्यावेळेस दिला नाही. त्यामुळे निष्कारण सदरहु जुना दावा प्रलंबित राहिलेला आहे.

७. सदरचा दावा हा सुमारे १० वर्षे इतका जुना आहे. त्यामुळे दाव्याचा

गुणदोषावर लवकरात लवकर निकाल होणे कायदयाला अपेक्षित आहे. त्यामुळे दाव्याच्या स्वरुपाचा विचार करता जर वादी यांना त्यांचा पुरावा घेण्याची संधी दिली नाही तर त्यांना त्यांचा बचाव घेण्यापासून अगर तक्रारी मांडण्यापासून वंचित ठेवल्यासारखे होईल. त्यामुळे केवळ सदरहु दावा गुणदोषावर चालण्याच्या एकमेव उद्देशाने वादींना पुन्हा पुरावा देण्यास परवानगी देणे उचित ठरते. परंतु सदरहु दावा जुना आहे ही बाब विचारात घेता वादी यांनी त्यांचा पुरावा दोन महिन्यामध्ये पुर्ण करावा असे त्यांना निर्देशित करणे आवश्यक ठरते. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत येत आहे –

**<u>आदेश</u>**

१. वादी यांचा निशाणी क्रमांक ११४ कडील अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी त्यांचा पुरावा दिनांक ०५.०८.२०२३ पुर्वी पुर्ण करावा असे त्यांना निर्देशित करण्यात येत आहे.

३. अर्जाचे स्वरुप पाहता खर्चाबाबत आदेश नाही.

४. उभय पक्षकारांनी हुकुमाची नोंद घ्यावी.

Abhay Ashok Mehendale
Digitally signed by Abhay Ashok Mehendale
Date: 2023.06.06 13:30:56 +0530

**सांगली.** **(अ. अ. मेहेंदळे)**

**दिनांक – ०६.०६.२०२३** **दुसरे सह–दिवाणी न्यायाधीश व. स्तर, सांगली.**

प्र मा ण प त्र

मी खात्रीपुर्वक सांगते की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | – | श्रीमती आर.व्ही.जाधव, |
| कोर्टाचे नाव | – | दुसरे सह दिवाणी न्यायालय व. स्तर, सांगली. |
| आदेश घोषीत दिनांक | – | ०६/०६/२०२३. |
| पी.डी.एफ/अपलोडचा दिनांक | – | ०६/०६/२०२३. |